# वर्धा, नागपुर, अमरावती, पुणे, अकोला, येथील गुन्हयातील फरार असलेला ए.टि.एम. मधील बॅटऱ्या चोरी करणारा अट्टल आरोपी पोलीस स्टेशन वर्धा शहर येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळयात.

दि. २१/०१/२०२१ रोजी युनीयन बँकेचे रिप्रेझेन्टेटीव फिर्यादी नामे श्रीकांत पुरुषोत्तम ईखे, रा. रूख्मीनी नगर, अमरावती यांनी पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे तक्रार दिली की युनीयन बॅक एटीएम मध्ये एटीएम मशीन करीता बसविण्यात आलेल्या एक्साईड कंपनीच्या बॅटऱ्या किंमत १०,०००/- रू. च्या कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्या आहे. अश्या फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे अपराध क्र. ८०/२०२१ कलम ३८०, ३४ भादंविचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. तसेच फिर्यादी नामे अमोल हनुमंतराव तिघरे, रा. बोरगाव मेघे यांनी रिपोर्ट दिला कि, बोरगाव मेघे व स्टेशन फैल येथील रेल्वे स्टेशन समोरील एटीएम मधील ॲमरॉन कंपनीच्या ६ बॅटऱ्या व ३ बॅटऱ्या एक्साईड कंपनीच्या एकूण कि. ४५,०००/- रू. च्या कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्या आहे. अश्या फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे अपराध क्रमांक ८१/२०२१ कलम ३८०, ३४ भादंविचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर दोन्ही गुन्ह्याचा तपास सुरू असतांना मुखबीरकडून गोपनीय माहिती मिळाली कि, सदर दोन्ही गुन्ह्यातील आरोपी हे अकोला येथे आहे. त्यावरून आरोपी क्र.१) जगदीश जगदेव हिवराळे, वय ३१ वर्ष, रा. बाळापुर जि. अकोला येथुन अटक करण्यात आली परंतु गुन्ह्यातील दुसरा आरोपी भगवान विश्वनाथ सदार हा तेथुन पळ काढण्यात यशस्वी झाला होता. सदर आरोपीस अटक करण्याकरिता मुखबीर लावण्यात आले व माहिती मिळताच भगवान विष्वनाथ सदार, वय ३६ वर्ष, रा. चतारी, ता. पातुर जि. अकोला यास पतारी या गावातुन मोठ्या शिताफीने ताब्यात घेण्यात आले. आरोपी भगवान विश्वनाथ सदार हा वर्धा, नागपुर, अमरावती, पुणे व अकोला येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात फरार असुन त्यास ए.टि.एम मधील बॅटऱ्या चोरीच्या बऱ्याच गुन्हयात अटक करणे बाकी आहे. पुढील तपास सुरु आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री सत्यवीर बंडीवार यांचे निर्देशानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अंमलदार बाबाराव बोरकुटे, दिवाकर परिमल, सुभाष गावळ, गितेश देवघरे, विकास मुंडे, पवण निलेकर सर्व नेमणूक पोलीस स्टेशन वर्धा शहर यांनी केली.